## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : ६५७/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.श्री रविंद्र नाईक
समुद्र शोभा, आलेवाडी, पो.नांदगाव
ता.जि.पालघर ४०१ ५०१

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
सं व सु उपविभाग बोईसर (ग्रा), उप कार्यकारी
अभियंता यांचे कार्यालय, ३३/११ के.व्ही.,
एम.आय.डी.सी. उपकेंद्र क्र.१, मुंबई तारापूर
ट्रान्सपोर्ट जवळ, पो.टॅप्स जि.पालघर

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
सं व सु उपविभाग बोईसर (ग्रा), उप कार्यकारी
अभियंता यांचे कार्यालय, ३३/११ के.व्ही.,
एम.आय.डी.सी. उपकेंद्र क्र.१, मुंबई तारापूर
ट्रान्सपोर्ट जवळ, पो.टॅप्स जि.पालघर

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ३०/७/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २३/३/२०२१ | ---- | १७/८/२०२१ | २८/९/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२५/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३०/७/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.रुपेश नरोत्तम पाटील सध्या कार्यरत-उप कार्यकारी अभियंता, महावितण मुख्य कार्यालय मुंबई अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.नरेंद्र हनुमंत संगेपू, उप कार्यकारी अभियंता, उपविभाग बोईसर ग्रा. उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *आपल्या कार्यालयाच्या हद्दीमधील मौजे नांदगाव येथील ग्राहक क्र.००४९२०४१७४७२, ग्राहक क्र.००४९२०००६७५८, ग्राहक क्र.००४९२०००४३१३ ता.जि.पालघर या विद्युत ग्राहकांची संपूर्ण माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२८/९/२०२१ रोजी, "*जन माहिती अधिकारी, उपविभाग बोईसर (ग्रामीण) यांनी पुनश्च पडताळणी करून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व वरीलप्रमाणे सदर ३ ग्राहकांच्या विज जोडणी व वापर इत्यादीबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अपिलार्थी यांना १५ कार्यालयीन दिवसांमध्ये त्यांनी मागितलेली माहिती दयावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती दि.२५/६/२०२१ रोजी दिलेली आहे. त्याविरुध्दच्या प्रथम अपीलामध्ये दि.२८/९/२०२१ रोजी निर्णय दिला त्यामध्ये

नमूद केले की, जन माहिती अधिकारी, उपविभाग बोईसर (ग्रामीण) यांनी पुनश्च पडताळणी करून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व वरीलप्रमाणे सदर ३ ग्राहकांच्या विज जोडणी व वापर इत्यादीबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अपिलार्थी यांना १५ कार्यालयीन दिवसांमध्ये त्यांनी मागितलेली माहिती दयावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रथम अपीलाच्या या आदेशानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार १५ दिवसात कार्यवाही पुर्ण करून तसे तक्रारकर्ता यांना समक्ष/ जलद टपालाने कळवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० जुलै, २०२५ .

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**